महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत/ शिष्यवृत्ती /9699 दिनांक- २०.०७.२०१९.

20 JUL 2019

**अत्यंत महत्वाचे**

**परिपत्रक -**

**विषय- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची नोंदणी करणेबाबत.**

केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १. केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३.अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ मध्ये महाविद्यालय / संस्था यांचे एनएसपी पोर्टलवर दुबार नावांची नोंद असणे, महाविद्यालयांचा AISHE CODE नसणे, एकापेक्षा अधिक महाविद्यालयाचा भ्रमणध्वनी क्रमांक एकच असणे इ. कारणामुळे महाविद्यालयांची / संस्थाची माहिती NSP पोर्टलवरुन काढण्यात आलेली असून, याबाबत अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, दिल्ली यांच्या दि. ५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार संस्था / महाविद्यालय यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. सर्व महाविद्यालय / संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने AISHE / U-DISE/ NCVT / SCVT CODE सह NSP पोर्टलवर पुन्हा नोंदणी करणे आवश्यक आहे.
२. सद्यस्थितीत NSP पोर्टलवर नोंदविण्यात आलेले महाविद्यालय / संस्था यांचे ईमेल आय.डी., मोबाईल क्रमांक हे वगळण्यात आलेले आहेत.
३. महाविद्यालयांनी NSP पोर्टलवर दिलेल्या सूचनांचा काळजीपूर्वक अभ्यास करुन ऑनलाईन अर्ज भरावा. अर्जामध्ये AISHE / U-DISE/ NCVT / SCVT CODE याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव व इतर माहिती असणे आवश्यक आहे. सदरच्या माहितीमध्ये तफावत आढळल्यास आपल्या महाविद्यालयाचे नाव पोर्टलवर समाविष्ट करण्यात येणार नाही. याची दखल घ्यावी.
४. संस्था / महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने NSP पोर्टलवर नोंदणीसाठी भरलेला अर्ज पडताळणी करीता दोन प्रतीमध्ये संचालनालयास व्यक्तीशः सादर करणे आवश्यक आहे. अशा अर्जाची साक्षांकित / मूळ कागदपत्रांसह संचालनालय स्तरावर छाननी करण्यात येणार असून, त्यानंतरच संबंधित महाविद्यालय / संस्था यांना पुढील कार्यवाही करता येणार आहे.
५. NSP पोर्टलवर महाविद्यालयाच्या नोंदणीसाठी ऑनलाईन अर्जामध्ये Institute Nodal officer तसेच Head of Institute यांची माहिती भरावयाची आहे,अर्जामध्ये नमूद केलेल्या Institute Nodal officer यांच्या मोबाईल क्रमांकावर सदर महाविद्यालयाचा युजर आय.डी. व पासवर्ड, ओटीपी तसेच पोर्टलशी संबंधित सर्व माहिती कळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदरची माहिती अचूक नमुद करणे आवश्यक आहे.
६. संस्था / महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज **दोन प्रतीत** , अर्जासोबत Upload करण्यात आलेले ओळखपत्र (Government Issued ID Proof ) तसेच AISHE / U-DISE/ NCVT / SCVT

CODE याबाबतचे प्रमाणपत्र, इ. कागदपत्रे महाविद्यालयाच्या Covering Letter सह पडताळणी करीता संचालनालयास दाखल करणे आवश्यक आहे.

७. कागदपत्रांची पडताळणी करुन महाविद्यालयांना अर्जाची एक प्रत देण्यात येईल. सदरची प्रत महाविद्यालयांनी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदर अर्जाची प्रत संबंधित अधिका-यांनी वेळोवळी मागणी केल्यानंतर दाखविणे आवश्यक आहे.

८. **सदर शिष्यवृत्तीसाठी दिनांक १५ जुलै २०१९ पासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे.** आपल्या महाविद्यालयाची / संस्थेची पोर्टलवर नोंदणी झाल्याशिवाय महाविद्यालयांना पुढील कार्यवाही करता येणार नाही. ही बाब विचारात घेता आपल्या महाविद्यालयाची / संस्थेची पोर्टलवर नोंदणी प्रथम प्राधान्याने करावी.

९. **ज्या महाविद्यालय / संस्था यांची अद्याप पर्यंत NSP पोर्टलवर नोंदणी (Registration) झालेली नाही अशा महाविद्यालयांनी /संस्थानी दि. ३०.०७.२०१९ पर्यंत पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.**

| अ क्र | विभागाचे नांव | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुणे | पुणे, अहमदनगर, नाशिक | दि. २२.०७.२०१९ ते दि.२४.०७.२०१९ |
| २ | पनवेल | ठाणे,पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, | दि. २५.०७.२०१९ ते दि. २६.०७.२०१९ |
| ३ | मुंबई | मुंबई शहर,मुंबई उपनगर | दि. २९.०७.२०१९ ते दि. ३०.०७.२०१९ |
| ४ | **कोल्हापूर** | सांगली,सातारा,कोल्हापूर | दि. ३१.०७.२०१९ ते दि.०२.०८.२०१९ |
| ५ | सोलापूर | सोलापूर | दि. ०३.०८.२०१९ ते दि.०३.०८.२[illegible] |
| ६ | औरंगाबाद | औरंगाबाद,जालना,उस्मानाबाद,बीड, | दि. ०५.०८.२०१९ ते दि.०७.०८.२०१९ |
| ७ | नांदेड | नांदेड,लातूर,हिंगोली,परभणी, | दि. ०८.०८.२०१९ ते दि.०९.०८.२०१९ |
| ८ | जळगांव | जळगांव,धुळे,नंदूरबार | दि. १३.०८.२०१९ ते दि.१४.०८.२०१९ |
| ९ | अमरावती | अमरावती,वाशिम,यवतमाळ,अकोला,बुलढाणा | दि. १९.०८.२०१९ ते दि.२२.०८.२०१९ |
| १० | नागपूर | नागपूर,भंडारा,चंद्रपूर,गोंदिया,वर्धा,गडचिरोली | दि. २६.०८.२०१९ ते दि.२९.०८.२०१९ |

तरी याबाबत उपरोक्त कालावधीत छाननीसाठी **शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे-०१,(शिष्यवृत्ती शाखा)** येथे आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,विनानुदानित,कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था / विद्यापीठे यांना कार्यालयीन वेळेत समक्ष उपस्थित रहाणेबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ सुचना देणेत याव्यात. तसेच कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता ११ वी ,१२ वी ) अध्यापक महाविद्यालये (डी.टी.एड ),आयटीआय, पॉलिटेक्निक , नर्सिंग इत्यादि अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना देखील याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण ,महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव,सर्व अकृषि /अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.